# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित,

मुख्य कार्यालय : महाबीज भवन : कृषिनगर, अकोलाः ४४४ १०४.

(CIN):-U०१२००MH१९७६SGC०१८९९० E-mail: hoadmin@mahabeej.com


जा.क्र.महाबीज/प्रशासन/सहायक/अं.से.ज्ये.सू./२०२३/१८६१ दि.११/१२/२०२३

## परिपत्रक

**विषय :- शिपाई-पहारेकरी या संवर्गाची दि.०१.०४.२०२२ रोजीची अंतीम सेवा ज्येष्ठता सूची (Final Seniority List) प्रसिध्द करणेबाबत.**

संदर्भ:- १) या कार्यालयाचे परिपत्रक पत्र क्रमांक MSSC/ADMN/ASSTT/२०२२/६७२ Dt.२६/०४/२०२२.

२) या कार्यालयाचे परिपत्रक पत्र क्रमांक जा.क्र.महाबीज/प्रशासन/सु.प्रा.से.ज्ये.सू./२०२३/९७२ दिनांक ०७.०७.२०२३

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये महामंडळाच्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांची दि.०१.०४.२०२२ रोजीची तात्पुरती सेवा ज्येष्ठता सूची (Provisional Seniority List) इंग्रजी भाषेमध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच संबंधित विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख/ नियंत्रण अधिकारी यांना सदर यादी त्यांचे अधिनस्थ अधिकारी/कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणून/प्रसारित करुन त्या अनुषंगाने संबंधितांचे आक्षेप/हरकती असल्यास दि.१५ मे, २०२२ पर्यंत सादर करणेबाबत सूचित करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने **शिपाई-पहारेकरी** या संवर्गातील काही कर्मचाऱ्यांकडून दि.०१.०४.२०२२ रोजीच्या तात्पुरती सेवा ज्येष्ठता सूची (Provisional Seniority List) नुसार निश्चीत केलेल्या त्यांच्या सेवा ज्येष्ठता क्रमाबाबत आक्षेप/हरकती प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त झालेल्या आक्षेप/हरकतींचे अवलोकन करुन महाबीज सेवा नियम-१९९५ च्या नियम १६ नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील तरतुदीनुसार आक्षेप/हरकतींची पडताळणी करण्यात आली. महाबीज सेवा नियम-१९९५ च्या नियम १६ मध्ये महामंडळाच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता निश्चित करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतुद आहे:-

**16 PROCEDURE FOR FIXATION OF SENIORITY :**

**i)** The Seniority of employees in case of fresh appointee selected by the Selection Committee shall be determined as under ;

**a)** In case of open market recruitment, the date of reporting will be the date of joining

**b)** In case of more than one candidates, selected on the basis of merit list, joining within the prescribed time given in the appointment offer, the seniority will be decided on the basis of position in the merit list.

**c)** Seniority on promotion to higher grade shall be according to the merit list prepared by the Selection Committee.

**d)** Where the dates of appointment in the posts, cadre of service of any two or more persons, determined after assigning the deemed dates, if necessary are identical, the person senior in age, shall be considered as senior for the purpose of determining the seniority.

**e)** The seniority will be finally determined by the date of confirmation in service and, therefore, even if some employees appointed earlier and they were not confirmed, they will rank as junior.

**ii)** The seniority of the employees shall be known to the individual by publishing a Seniority List furnishing date of joining, date of birth, educational qualifications and professional / technical qualifications and date of confirmation by the Management at least once in five years as on 1st April of respective year.

शिपाई-पहारेकरी या संवर्गातील कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेले आक्षेप/हरकतीचे निराकरण करणेस्तव महाबीज सेवा नियम-१९९५ च्या नियम १६ नुसार सेवा ज्येष्ठता यादी सुधारीत करण्याची बाब व्यवस्थापनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने प्राप्त झालेले आक्षेप/हरकती विचारात घेवून महाबीज सेवा नियम-१९९५ च्या नियम १६ मधील तरतूदीनुसार दि.०१.०४.२०२२ रोजीची सुधारीत प्रारुप सेवा ज्येष्ठता सूची (Revised Provisional Seniority List) संदर्भाधीन क्रमांक २ वरिल परिपत्रकाद्वारे मराठी भाषेत प्रसिध्द करण्यात आली होती आणि प्रारुप सेवाज्येष्ठता सूची बाबत आक्षेप / हरकती सादर करण्याबाबत निर्देशित केले होते. तद्अनुषंगाने प्राप्त झालेले आक्षेप/ हरकतींचे निराकरण करणेस्तव दिनांक २६.०७.२०२३ रोजी शिपाई-पहारेकरी संवर्गातील कर्मचाऱ्यांना मा.व्यवस्थापकीय संचालक यांचे समक्ष सुनावणी देवून संबंधित कर्मचाऱ्यांचे म्हणने ऐकुन घेण्यात आले असून, त्या अनुषंगाने शिपाई-पहारेकरी संवर्गाची सुधारीत प्रारुप सेवाज्येष्ठता सूची अंतीम करण्याची बाब व्यवस्थापनाच्या विचाराधीन होती.

प्राप्त झालेले आक्षेप / हरकतींच्या तपासणी अंती शिपाई-पहारेकरी संवर्गातील कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी महाबीज सेवा नियम १६ (i)(b) प्रमाणे "नियुक्त कर्मचारी जर नियुक्ती पत्रात नमूद केलेल्या विहीत कालावधीत नियुक्तीच्या पदावर रुजू झाला असेल तर गुणवत्ता यादीतील /निवड यादीतील क्रमानुसार आणि नियुक्त कर्मचारी जर नियुक्ती पत्रात नमूद केलेल्या विहीत कालावधीत नियुक्तीच्या पदावर रुजू झाला नसेल तर महामंडळात रुजू झाल्याच्या तारखेपासून सेवाज्येष्ठता क्रमांक निश्चित करुन अंतीम करण्यात येत आहे. " तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील तरतुदीनुसार ज्या कर्मचाऱ्यांना प्रतिक्षा सूची मधून निवड करुन नियुक्ती देण्यात आली आहे त्यांची सेवाज्येष्ठता त्यांच्या रुजू दिनांकानुसार निश्चित करुन अंतीम करण्यात येत आहे. महाबीज सेवा नियम-१९९५ च्या नियम १६ नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील तरतुदींच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक २ वरिल परीपत्रकानुसार सुधारीत प्रारुप सेवाज्येष्ठता सूची प्रसिध्द करुन आक्षेप/हरकती मागविण्यात आल्या होत्या व संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांचे म्हणने मांडण्यासाठी सुनावणी देवून त्यांचे म्हणने एकून घेतल्यावर नियमातील तरतूदीनुसार शिपाई-पहारेकरी संवर्गाची सेवाज्येष्ठता अंतीम करण्यात येत आहे. त्यामुळे यानंतर प्राप्त होणारे आक्षेप / हरकतींचा विचार करण्यात येणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

कार्यालय प्रमुख (सर्व)/ नियंत्रण अधिकारी (सर्व) यांना सूचित करण्यात येते की, शिपाई-पहारेकरी संवर्गातील कर्मचाऱ्यांना त्यांचे संवर्गाची अंतीम सेवाज्येष्ठता सूचीची (Final Seniority List) एक प्रत देण्यात यावी तसेच सदर अंतीम सेवा ज्येष्ठता सूची (Final Seniority List) महामंडळाचे अधिकृत संकेतस्थळ www.mahabeej.com वर सुध्दा सर्व संबंधितांच्या माहितीसाठी प्रसिध्द करुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

म.रा.बि.म.मर्यादित करिता,

**(टिपणी मा.व्य.सं.कडून मान्य)**

(डॉ.प्रफुल्ल लहाने)
महाव्यवस्थापक (प्रशासन)

<u>प्रतिलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव:-</u>

१. सर्व विभाग प्रमुख, मराबिम मर्यादित............................................
२. सर्व विभागीय व्यवस्थापक/उपविभागीय व्यवस्थापक,मराबिम मर्या.............
३. सर्व जिल्हा व्यवस्थापक, मराबिम मर्या..........................................
४. मा.व्यवस्थापकीय संचालक यांचे स्विय सहायक यांना माहितीस्तव.
५. संबधीत नस्ती/वैयक्तीक नस्ती.